मुंबई लक्षदीप रविवार, दि. २ सप्टेंबर २०१८

# हॅथवे केबल ॲण्ड डाटाकॉम लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** रहेजास, ४था मजला, मेन एव्हेन्यू व व्ही.पी.रोडचा कॉर्नर, सांताक्रूझ (प), मुंबई-४०००५४.
**दूर.:** ९१-२२-२६००१३०६, **फॅक्स:** ९१-२२-२६००१३०७
**सीआयएन:** एल६४२०४एमएच१९५९पीएलसी०११४२१
**वेबसाईट:** www.hathway.com **ई-मेल:** info@hathway.net

## सदस्यांना सूचना

कंपनीच्या सदस्यांना येथे सूचित करण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ (कायदा) च्या कलम १०८ व कलम ११० सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) अधिनियम, २०१४ (अमलातील काळाकरिता कोणतीही वैधानिक फेरबदल किंवा पुर्नकायदा समाविष्ट) नुसार खालील ठरावांवर कंपनीने **शुक्रवार, दि. २४ ऑगस्ट, २०१८** (निश्चित दिनांक) रोजी सदस्य नोंद पुस्तक/लाभार्थी मालकांचे नोंद पुस्तक मध्ये ज्या सदस्यांची नावे नमूद आहेत त्यांना विद्युत स्वरूपाने (ई-वोटिंग) मतदानासह टपाल मतदानाद्वारे सदस्यांची अनुमती घेण्यासाठी,टपाल मतदान पत्रिकासह टपाल मतदान सूचना व स्पष्टीकरण अहवाल पाठविण्यात आलेला आहे.

१. कंपनी कायदा २०१३ चे कलम १९६, १९७, १९८, २०३ व इतर लागू तरतुदी सहवाचिता कंपनी (व्यवस्थापकीय अधिकारीची नियुक्ती व वेतनश्रेणी) अधिनियम २०१४ (अमंलातील वेळेकरिता कोणतेही वैधानिक फेरबदलासह) च्या तरतुदीअंतर्गत श्री. राजन गुप्ता यांची कंपनीची व्यवस्थापकीय संचालक म्हणून पुर्ननियुक्ती व वेतनश्रेणीस मान्यता देण्यासाठी विशेष ठराव.
२. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ६२(१)(ब) आणि इतर लागु तरतुदी सहवाचिता कंपनीज् (शेअर कॅपिटल ॲण्ड डिबेंचर्स) रुल्स, २०१४ चे नियम १२ आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर बेस एम्प्लॉई बेनिफीट) रेग्युलेशन्स, २०१४ (अमंलातील वेळेकरिता कोणतेही वैधानिक फेरबदलासह) च्या अंतर्गत कंपनी **हॅथवे एम्प्लॉई स्टॉक ऑप्शन प्लान २०१८** मान्यतेसाठी विशेष ठराव.

ई-वोटिंग प्रक्रिया व टपाल मतदान योग्य वं पारदर्शकरित्या संचालनाकरिता तपासनीस म्हणून श्री.हिमांशु एस. कामदार, भागीदार मे.राठी ॲण्ड असोसिएट्स, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र.५१७१) यांची कंपनीच्या संचालक मंडळाने नियुक्ती केली आहे.

टपाल मतदानपत्रिका व स्वपत्ता लिहिलेले मुद्रांक शुल्क भरलेले व्यवसाय प्रतिसाद लिफाफेसह टपाल मतदान सूचना वितरणाची प्रक्रिया कंपनीने **शनिवार, १ सप्टेंबर, २०१८** रोजी पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. सविस्तर सूचना व ई-वोटिंगबाबत माहिती सदस्यांना पाठविण्यात आलेल्या टपाल मतदान सूचनेत नमूद केलेली आहे.

नोंद दिनांकाला सदस्यांच्या नावे नोंद भरणा केलेल्या शेअर्सच्या मूल्यावर सदस्यांचे मतदान अधिकार निश्चित असतील. जो व्यक्ती नोंद तारखेला सदस्य नसेल त्याने सदर सूचना माहितीकरिता म्हणून घ्यावी. सूचना व स्पष्टीकरण अहवाल तसेच बॅलेट पेपरचे नमुना आणि ई-वोटिंगबाबत सर्व तपशिल कंपनीच्या www.hathway.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ज्या सदस्यांकडे वास्तविक/डिमॅट स्वरूपात भागधारणा आहे त्यांना विद्युत स्वरूपाने किंवा टपाल मतदान पत्रिकेने मतदानाचा पर्याय असेल. सदस्यांना मतदानाचा कोणताही एक पर्याय अर्थात टपाल मतदान पत्रिकेने किंवा विद्युत पध्दतीने मतदानाचा पर्याय स्विकारावा लागेल. जर सदस्याने वास्तविक टपाल मतदान तसेच विद्युत पध्दतीने मतदान केल्यास विद्युत पध्दतीने केलेले मतदान ग्राह्य धरले जाईल आणि टपाल मतदान अवैध ठरवले जाईल.

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की:

१. जर सदस्याने वास्तविक टपाल मतदानपत्रिकेने मतदान केल्यास सदर नमुनापत्र पूर्णपणे भरून व स्वाक्षरी करून तपासनीस यांच्याकडे **मंगळवार, २ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं.५.००वा. पर्यंत** कार्यालयीन वेळ समाप्तीपूर्वी पोहोचतील अशा तऱ्हेने पाठवावेत. सदर तारखेनंतर प्राप्त सर्व टपाल मतदान पत्रिका हे सदस्यांचे प्रतिसाद असले तरीही प्राप्त झालेले नाहीत असे समजण्यात येईल.
२. जर सदस्याने ई-वोटिंगने मतदानाचा पर्याय स्वीकारल्यास त्यांनी त्यांचे मत **सोमवार, ३ सप्टेंबर, २०१८ रोजी स.१०.०० ते मंगळवार, २ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं.५.००वा. पर्यंत** ऑनलाईन द्यावे. कृपया नोंद असावी की, तदनंतर मतदानाकरिता ई-वोटिंग पध्दत बंद केली जाईल.

ज्या सदस्यांना टपाल मतदानपत्रिका प्राप्त झाली नसेल त्यांनी कंपनीच्या (www.hathway.com) या वेबसाईटवरून डाउनलोड करून घ्यावे किंवा कंपनीचे निबंधक व भाग हस्तांतरण प्रतिनिधी **मे. लिंक इनटाईम इंडिया प्रा.लि.**, सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३ येथे वास्तविक सूचना व टपाल मतदानपत्रिका प्राप्त करण्यासाठी लेखी स्वरूपात दुय्यम टपाल मतदान पत्रिकाकरिता अर्ज करावा.

गुरुवार, ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी दु.३.००वा. ८०५/८०६, विंडसर, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८ येथे निकाल घोषित केला जाईल आणि कंपनीच्या www.hathway.com वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल.

विद्युत मतदानासह टपाल मतदान संदर्भात तक्रारीचे निवारण करण्यास जबाबदार व्यक्तीचे संपर्क तपशिल खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| नाव | श्रीमती जिनी एलिझाबेथ |
| पत्ता | मे. लिंक इनटाईम इंडिया प्रा.लि., (निबंधक व हस्तांतरण प्रतिनिधी) सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३ |
| दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी | ०२२-४९१८६०००/९९६९७०३७८० |

**हॅथवे केबल ॲण्ड डाटाकॉम लिमिटेडकरिता**
**सही/-**
**अजय सिंग**
प्रमुख कॉर्पोरेट विधी कंपनी सचिव व
मुख्य सक्षम अधिकारी
(एफसीएस-५१८९)

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०१.०९.२०१८